403

वाचा :- १. संचालनालयाचे कार्यालयीन आदेश क्रमांक २२ दिनांक १८.०४.२०११

२. संचालनालयाचे पत्र क्रमांक स्था.१८/ब/राज्यस्तरीय बैठक / इतिवृत्त / ९५७ दिनांक २२.०५.२०१३

स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय,
महाराष्ट्र राज्य,कोंकण भवन,६ वा मजला,
नवी मुंबई ४०० ६१४
दिनांक :- 3 JUL 2013

कार्यालयीन आदेश क्र.-७९.

विषय :- ग्रामपंचायत लेखापरीक्षण अहवालाच्या पुनर्विलोकनाबाबत.

संदर्भीय वाचा क्रमांक १ मध्ये ग्रामपंचायतींच्या लेखापरीक्षण अहवालाचे पुनर्विलोकना बाबत स्पष्ट आदेश आहेत . सदरच्या आदेशा मधील मुद्दा क्रमांक ११ नुसार दिलेल्या टक्केवारी व वर्गवारी बाबत खालील प्रमाणे स्पष्ट आदेश देण्यात आलेले आहेत .

१. १० लाखापर्यंत उत्पन्न असलेल्या ग्रामपंचायती :- १० % अहवालाचे पुनर्विलोकन जिल्हा लेखापरीक्षा अधिकारी यांनी करावयाचे आहे .
२. १० लाख ते ५० लाखापर्यंत उत्पन्न असलेल्या ग्रामपंचायती :- २५ % अहवालाचे पुनर्विलोकन जिल्हा लेखापरीक्षा अधिकारी यांनी करावयाचे आहे
३. ५० लाखापेक्षा जास्त उत्पन्न असणा-या ग्रामपंचायती :- २५ % अहवालाचे पुनर्विलोकन सहाय्यक संचालक यांनी करावयाचे आहे .

दिनांक १५, १६ एप्रिल २०१२ रोजी पुणे येथे झालेल्या राज्य स्तरीय आढावा बैठकी मध्ये विषय क्रमांक ७ नुसार सर्व विभागीय सह संचालकांनी पुनर्विलोकनाबाबत आदेश क्रमांक २२ दिनांक १९/०४/२०११ नुसार कार्यवाही होत नसल्याचे सांगितले . तरी संदर्भीय वाचा क्रमांक २ च्या बैठकीच इतिवृत्त निर्गमीत केले असून त्या अनुषंगाने खालील प्रमाणे सुधारीत आदेश देण्यात येत आहेत .

१. वाचा क्रमाक १ मध्ये देण्यात आलेल्या निर्देशानुसार / आदेशानुसार ग्रामपंचायत लेखापरीक्षण अहवालाचे पुनर्विलोकन करण्यात यावे .
२. पुनर्विलोकन अहवाल तयार केल्यानंतर ज्या अधिकाऱ्याने त्याचे पुनर्विलोकन केले आहे , त्यांच्या स्वाक्षरीनिशी अहवाल निर्गमीत करण्यात यावा .

( का.मा.विधाते )
संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
महाराष्ट्र राज्य

प्रत :-

१. सह संचालक , स्थानिक निधी लेखापरीक्षा , कोंकण विभाग, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपुर .
२. सहाय्यक संचालक , स्थानिक निधी लेखापरीक्षा (सर्व )
३. सहाय्यक लेखापरीक्षा अधिकारी (अहवाल / पं.रा.स.)
४. सहाय्यक अधिक्षक (अहवाल)
५. कार्यालयीन आदेश नस्ती .